# पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्र.०२०—२५६०११८९/११९०
फॅक्स नं. : ०२०—२५६९७३८८
संकेतस्थळ: www.unipune.ac.in

आरक्षण कक्ष
गणेशखिंड, पुणे ४११००७

संदर्भ क्रमांक :- आरक्षण/ओ २२/३२४

दिनांक:- १२/०४/२०१२

प्रति,
मा.प्राचार्य / मा. संचालक,
पुणे विद्यापीठ संलग्नीत सर्व महाविद्यालये / मान्यताप्राप्त संस्था.

विषयः- मागासवर्गीय कर्मचा-यांच्या प्रश्नांवर तातडीने कार्यवाही करण्याबाबत...

महोदय / महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, मागासवर्गीय कर्मचा-यांच्या प्रश्नांवर तातडीने कार्यवाही करण्यासंदर्भात शासनाने निर्गमीत केलेले शासन परिपत्रक क्रमांक मावअ २०१२/प्र.क्र.१९-२०१२/आस्था-२, दिनांक ०६/०३/२०१२ ची प्रत सोबत जोडत आहे. तरी शासनाने सदर परिपत्रकान्वये निर्गमीत केलेल्या सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती विद्यापीठ कार्यालयास सादर करावी, ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

सोबतः- वरीलप्रमाणे

12/4/2012

सहायक कुलसचिव
(आरक्षण कक्ष)

आवक कक्ष
पुणे विद्यापीठ, पुणे - ४११ ००७
दिनांक - 22/3/12 क्रमांक - 386
विभाग -

मागासवर्गीय कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांवर तातडीने कार्यवाही करण्याबाबत...

## महाराष्ट्र शासन
## उच्च व तंत्रशिक्षण विभाग

**परिपत्रक क्रमांक : मावअ २०१२/ प्र.क्र. १९-२०१२/आस्था-२**

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

दिनांक : ६.३.२०१२

UNIVERSITY OF PUNE (General Section)
21 MAR 2012
Inward No 262

### शासन परिपत्रक

कास्ट्राईब कर्मचारी महासंघ यांनी शासनाच्या असे निदर्शनास आणले आहे की, मागासवर्गीय अधिकारी / कर्मचारी यांच्या मागण्यांबाबत व त्यांच्या अडचणींबाबत क्षेत्रिय स्तरावर कार्यवाही केली जात नाही. परिणामी त्यांच्यामध्ये अन्यायाची भावना निर्माण होते. मागासवर्गीय अधिकारी / कर्मचारी यांचे प्रश्न स्थानिक पातळीवरुन पुरेशा गांभीर्याने न हाताळल्याने, बऱ्याचदा त्यांना दाद मागण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे जावे लागते. मात्र हे प्रश्न स्थानिक पातळीवरुन योग्य प्रकारे हाताळले गेल्यास, अशा अधिकारी / कर्मचाऱ्यांना वरिष्ठ स्तरापर्यंत येण्याची आवश्यकता भासणार नाही, असेही संघटनेने शासनाच्या निदर्शनास आणले आहे. उपरोक्त परिस्थिती विचारात घेता, यासंदर्भात विभागांतर्गत सर्व संचालनालये, विद्यापीठे, अनुदानित अशासकीय संस्था व त्यांच्याअंतर्गत सर्व कार्यालये यांना खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

२. शासकीय / निमशासकीय कार्यालये, विद्यापीठे तसेच अनुदानित संस्थांमध्ये, सेवाभरती व पदोन्नतीमध्ये आरक्षण अधिनियमाची काटेकोर अंमलबजावणी करण्यात यावी. त्याकरिता सर्व स्तरावरील कार्यालयांमधून प्रत्येक संवर्गाच्या बिंदूनामावल्या अद्ययावत ठेवण्यात याव्यात. असे करताना शासनाने वेळोवेळी दिलेल्या आदेशांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे जेणेकरुन मागासवर्गीय अधिकारी / कर्मचारी यांच्यावर अन्याय होणार नाही.

३. मागासवर्गीय अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या हितासाठी कार्य करणाऱ्या संघटनांच्या प्रश्नांबाबत व उचित मागण्यांसदर्भात, त्यांच्या प्रतिनिधींशी संवाद साधणे आवश्यक आहे. सबब, विभागप्रमुख / कार्यालयप्रमुख यांनी तीन महिन्यातून किमान एकदा बैठक आयोजित करावी व आवश्यकता भासल्यास त्या-त्यावेळी संघटनांच्या प्रतिनिधींशी चर्चा करुन अडचणींचे निराकरण करावे.

४. उपरोक्त सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे तसेच सदर सूचना आपल्या अधिपत्याखालील सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणण्यात याव्यात. शासकीय तसेच निमशासकीय कार्यालयांबरोबरच, विद्यापीठे व अनुदानित संस्थांमध्येही उपरोक्त बाबींची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी व अशा अंमलबजावणीचा आढावा प्रत्येक संचालक / सहसंचालक / कुलसचिव यांनी प्रत्येक महिन्यात घ्यावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**( बा. म. राऊत )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,

- उच्च व तंत्रशिक्षण विभागातील सर्व सहसचिव / उपसचिव,
- उच्च व तंत्रशिक्षण विभागातील सर्व अवर सचिव / कार्यासन अधिकारी,
- आयुक्त (व्यवसायप्रशिक्षण), संचालक (उच्चशिक्षण / व्यवसायशिक्षण / तंत्रशिक्षण / कला / ग्रंथालय),
- कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे,
- निवडनस्ती.